बीड । गुरूवार
२७.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३४८
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# अडथळा आणणाऱ्यांना संपवा, कायमचा धडा शिकवा !




## उज्ज्वल निकमांकडून कोर्टात वाल्मिक कराडच्या फोनवरील संभाषणाचा उल्लेख

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी बुधवारी बीडच्या मकोका न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी विशेष सरकारी वकील ॲडव्होकेट उज्ज्वल निकम यांनी पहिल्यांदाच न्यायालयात युक्तिवाद केला. उज्ज्वल निकम यांच्यासारखा हायप्रोफाईल वकील हा खटला लढवत असल्याने आजच्या सुनावणीला महत्त्व प्राप्त झाले होते. ते न्यायालयात काय बोलणार, याची उत्सुकता सर्वांना लागली होती. उज्ज्वल निकम यांनी आपल्या लौकिकाला जागत संतोष देशमुख हत्याप्रकरणाचा संपूर्ण घटनाक्रम आणि त्याच्याशी वाल्मिक कराड याचा असलेला थेट संबंध पहिल्याच सुनावणीत अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला.

आजच्या सुनावणीला वाल्मिक कराडचे वकील विकास खाडे आणि वकिलांची टीम उपस्थित होती. यावेळी वाल्मिक कराडसह अन्य आरोपींना व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी आरोपींची ओळख परेड झाली. विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी केस ओपन करण्याची मागणी केली. त्यांनी वाल्मिक कराड आणि विष्णू चाटेचा सीडीआर कोर्टासमोर सादर केला. त्यावेळी वाल्मिक कराडच्या वकिलांनी हे पुरावे आपल्याला देण्यात यावेत, अशी मागणी केली.

उज्ज्वल निकम यांच्या युक्तिवादामधील महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे

– आवादा ही एक ऊर्जा कंपनी आहे. या कंपनीने मस्साजोग गावातील शिवारात ३२ एकर जमिनीवर गोडाऊन केले.

– सुनील शिंदे हे प्रोजेक्ट मॅनेजर आहेत तर शिवाजी थोपटे हे कंपनीचे भूसंपादन अधिकारी आहेत.

– ८ ऑक्टोबर पासून खंडणी प्रकरणाला सुरुवात. आठ ऑक्टोबर रोजी परळी येथील जगमित्र कार्यालयात विष्णू चाटे, वाल्मीक कराड यांच्यासोबत कंपनीच्या अधिकारी शिवाजी थोपटे यांची बैठक झाली. वेळ सायंकाळी सात वाजता किती मिनिट झाली. वाल्मीक कराडने दोन कोटीची खंडणी मागणी करून काम थांबवा असे सांगितले. (या ठिकाणचे टॉवर लोकेशन आणि सीडीआर पुरावे)

– ९ ऑक्टोबर २०२४ थोपटे यांनी आवादा कंपनीचे उपाध्यक्ष अल्ताफ तांबोळी यांना फोनवरून दोन कोटीची खंडणी मागितल्याची माहिती दिली. व पोलिस तक्रार द्यावी का? अशी विचारणा केली. त्यावेळी अल्ताफ तांबोळी यांनी तक्रार देऊ नका असे सांगितले त्यामुळे या घटनेचा गुन्हा त्यावेळी नोंद झाला नाही.

– २६ नोव्हेंबर २०२४ सुदर्शन घुले हा गँगचा प्रमुख आहे. तो कराडचा निकटवर्तीय आहे. साडेअकरा वाजता तो साइटवर गेला. शिवाजी थोपटे याला धमकी दिली. कराडची मागणी पूर्ण न केल्यास काम बंद करा असे सांगितले. वाल्मीक कराडने सुदर्शन घुले मार्फत हा मेसेज दिला.

– २९ नोव्हेंबर २०२४ सकाळी साडेअकरा वाजता वाल्मीक कराडने विष्णू चाटेच्या मोबाईल वरून सुनील शिंदे यांना फोन केला. सुदर्शन घुलेने सांगितले त्या पद्धतीने काम करा. अन्यथा कंपनी बंद करा असे सांगितले. यावेळी सुनील शिंदे यांनी आपला फोन स्पीकरवर ठेवला होता. तो शिवाजी थोपटे हे ऐकत होते. थोपटे यांनी वाल्मीक कराड यांचा आवाज ओळखला.(वाल्मीक करडांच्या आवाजाच्या नमुनाचे पुरावे) शिवाय हा कॉल सुनील शिंदे यांनी रेकॉर्डही केला होता.

– २९ तारखेला दुपारी एक वाजता सुदर्शन घुले हा पुन्हा येथील कार्यालयात गेला व कराड यांना भेटला व त्यांची मागणी पूर्ण करा असा मेसेज सुनील शिंदे आणि शिवाजी थोपटे यांना दिला. याची व्हिडिओ रेकॉर्डिंग सुनील शिंदे यांच्याकडे आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# उद्या बीडमध्ये संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत महत्त्व पूर्ण बैठक

## मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आयोजक समितीचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासातून प्रेरणा घेऊन येणारी पिढी चारित्र्य संपन्न व सामर्थ्यशाली बनावी या हेतूने नवीन शैक्षणिक धोरणात छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावा या महत्वपूर्ण मागणी सोबतच



मराठा समाजातील विद्यार्थ्यांचे व कर्मचाऱ्यांचे प्रश्न सरकार समोर मांडून ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी उद्या शुक्रवार (ता. २८) रोजी संध्याकाळी सहा वाजता बीड शहरातील आशीर्वाद मंगल कार्यालय येथे मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्ह्यातील शिक्षक, वकील, डॉक्टर इंजिनिअर सर्व कर्मचारी व समाज बांधव संघटनेच्या भव्य बैठकीचे आयोजन केरण्यात आले आहे. मनोज दादा जरांगे यांच्या उपस्थितीत महत्त्वाच्या विषयावर चर्चा होणार या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान या बैठकीत मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेतात हे पाहणं सुद्धा महत्त्वाचं ठरणार आहे. या बैठकीस मेळाव्याचे स्वरूप निर्माण होणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील मराठा समाजाने या मेळाव्यास एक दिवस जातीसाठी या उद्धेशाने समाज बांधवानी मोठ्या प्रमाणात उपस्थितीत राहण्याचे आवाहन आयोजन समितीच्या केले आहे.

# डॉ.अशोक थोरात यांचे निलंबन मागे घेण्यात यावे !

## अन्यथा ५ एप्रिलला आत्मदहन : रोहन गलांडे पाटील



**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक दादा थोरात साहेब यांचे निलंबन ५ एप्रिल २०२५ पर्यंत मागे घेतले नाही तर ५ एप्रिल २०२५ रोजी आत्मदहन करण्याचा इशारा रोहन गलांडे पाटील यांनी सरकारला निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.या विषयी सविस्तर वृत्त असे की शल्यचिकित्सक डॉ. अशोक दादा थोरात साहेब यांचे निलंबन ५ एप्रिल २०२५ पर्यंत मागे घेतले नाही तर ५ एप्रिल २०२५ रोजी आत्मदहन करण्याचा इशारा सरकारला देतो निवेदनाद्वारे देण्यात ▶▶ उर्वरित पान २ वर

## भूमी अभिलेख अधिकारी प्रवीण मोरे यांची सरकारी कामात अडथळा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

**केज । प्रतिनिधी**

भूमी अभिलेख अधिकारी प्रवीण मोरे यांनी त्यांची आई कार्यरत असलेल्या एका सरकारी दवाखान्यातील महिला डॉक्टरांना सरकारी कामात अडथळा केल्याच्या व ढकलून देऊन धमकी दिल्याच्या आरोपातून भूमी अभिलेख अधिकारी प्रवीण मोरे यांची केज येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश श्री. सु. बा .भाजीपाले यांनी निर्दोष मुक्तता केली. सदर खटल्यात ॲड डी. डी. लांब , ॲड. विजय आर कुलकर्णी यांनी काम पाहिले. सरकार पक्षा तर्फे सरकारीअभियोक्ता श्री आर पी उदार यांनी बाजू मांडली.

# मजूर संस्थांचे अध्यक्ष फिरताहेत मर्सिडीजमधून, मुख्यमंत्री हैराण

**मुंबई । प्रतिनिधी**

मजूर संस्थांचे अध्यक्ष मजूर असणे अपेक्षित आहे. पण ते आता मर्सिडीज गाड्यांमधून फिरत आहेत. मजूर संस्थांचे अध्यक्ष मर्सिडीजमधून आले कुठून याचाही आपल्याता विचार करावा लागेल. मजूर संस्थांचा दुरुपयोग होणार नाही आणि खऱ्या मजूर संस्थांना कामे मिळतील, अशा प्रकारचा प्रयत्न करण्याच्या सूचना कामगार विभागाला दिल्या आहेत, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बड्या राजकीय नेत्यांना फटकारले. सिंधुदुर्ग जिह्यातीत ओरोसमधील जिल्हा उपनिबंधक व कार्यालय अधीक्षकांना लाच घेताना रंगेहाथ पकडल्याच्या संदर्भात शिवसेना आमदार वरुण सरदेसाई यांनी प्रश्न उपस्थित केला होता. ▶▶ उर्वरित पान २ वर




# बीडच्या बिंदुनामावली मुद्दयावर मंत्रालयात विशेष बैठक

- नियुक्त्यांमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्तांची समिती
- आ.सुरेश धस, आ.प्रकाश सोळंके, आ.संदीप क्षीरसागरांनी केली होती मागणी



**मुंबई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सर्वच शासकीय विभागांमध्ये अधिकारी आणि आणि कर्मचारी यांची नियुक्ती बिंदुनामावलीनुसार झालेल्या नाहीत. यासंदर्भात मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. यविषयी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.२६) रोजी मंत्रालयात विशेष बैठक पार पडली. या बैठकीत, बीड जिल्ह्यात झालेल्या शासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या नियुक्त्यांमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्याचे आदेश ना.अजित पवार यांनी दिले आहेत. याबाबत आ.सुरेश धस, आ.प्रकाश सोळंके, आ.संदीप क्षीरसागर यांनी तक्रारी केल्या होत्या. तसेच विधीमंडळात देखील हा मुद्दा अनेकवेळा उपस्थित केला गेला होता. शासनाच्या विभागांमध्ये बिंदुनामावलीनुसार पदांची मागणी करून पदभरती करण्यात येते. परंतु पदभरतीनंतर नियुक्ती देताना तसेच बदली व प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी बिंदुनामवलीचा ▶▶ उर्वरित पान २ वर



# तालुक्यातील मच्छिंद्रनाथ गड ते कानिफनाथ गड होणार रोपवे, कॅबिनेटमध्ये मंजुरी



**आष्टी । प्रतिनिधी**

भारतातील मच्छिंद्रनाथनाथाची एकमेव संजीवनी समाधी असलेल्या देवस्थानावर दिवसेंदिवस भाविकांची गर्दी वाढत असताना येथील नाथ भक्तांना अधिकाधिक सेवा देण्यासाठी मच्छिंद्रनाथ देवस्थानचे विश्वस्त तथा आमदार सुरेश धस यांनी शासन दरबारी पाठपुरावठा करत कॅबिनेट मध्ये स्वतःराज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आष्टी तालुक्यातील सावरगांव मायंबा ते पाथर्डी तालुक्यातील असलेल्या कानिफनाथ देवस्थान या ३.६ कि.मी.अंतरावर रोपवे ची मान्यता दिली असून,या सुविधेमुळे नाथभक्तांच्या वतीने आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री व राज्यशासनाचे आभार मानले आहेत.

राज्याच्या शासनाच्या पर्यटक विभागाने राज्यात NHLML कंपनी मार्फत नविन २९ पर्यटनठिकाणी रोपवे सुरु करण्याचा करार केला असून,यामध्ये ३.६ कि मी.साठी आष्टी तालुक्यातील मायंबा मच्छिंद्रनाथ गड ते पाथर्डी तालुक्यातील मढी येथील कानिफनाथ देवस्थानचा समावेश करण्यात आला असल्याने नाथभक्तांची सोय होणार आहे.यामुळे रोपवे मुळे नाथभक्तांना या स्थळांपर्यंत पोहोचणे अधिक सुलभ होणार असून, स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.

## शब्दांचे पक्के...देवेंद्र बाहुबली..!

**दि. ५ फेब्रुवारी रोजी राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब हे श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे संजीवन समाधी मंदिर भूमीपर्यंत सोहळ्यास उपस्थित होते त्यावेळी श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड देवस्थान ट्रस्ट व श्री क्षेत्र कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट मढी यांनी श्री. क्षेत्र मढी ते श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड (मायंबा) ते क्षेत्र कानिफनाथ गड मढी (मायंबा) रोप–वे यास मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब व केंद्रीय मंत्री श्री.नितीनजी गडकरी साहेब यांच्या सहकार्याने त्या कामास शासनाची मान्यता मिळाली असल्याने आष्टी तालुक्यातील क्षेत्र मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी व लगतच पाथर्डी तालुक्यात असणारे श्रीक्षेत्र कानिफनाथ संजीवन समाधी हे पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र हे हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून या ठिकाणी श्री मच्छिंद्रनाथ व कानिफनाथ यांच्या दर्शनासाठी लाखो भाविक राज्याच्या कानाकोपऱ्यातून येतात.सदरील रोप–वे मुळे येथील स्थानिक पर्यटनास चालना मिळणार असून त्या माध्यमातून रोजगार निर्मिती होईल.भाजपा महायुती सरकारच्या माध्यमातून मतदारसंघात विकासाची गंगा आणण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. शासनाच्या राष्ट्रीय रोप–वे कार्यक्रम–पर्वतमाला अंतर्गत श्री क्षेत्र सावरगांव (श्री मच्छिंद्रनाथ गड) ते श्री क्षेत्र मढी (चैतन्य कानिफनाथ गड) ते या ३.६ कि.मी. हवाई अंतरामध्ये रोप–वे बसविन्यास मान्यता दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब तसेच केंद्रीय मंत्री, श्री.नितीनजी गडकरी साहेब तसेच उपमुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री श्री.अजितजी पवार साहेब यांचे खुप खुप धन्यवाद...!**

**–सुरेश धस, आमदार**

**या प्रकल्पांमुळे बीड–नगर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला नवी दिशा मिळेल.ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढेल.स्थानिक कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन मिळेल.ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील.राज्य सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील पर्यटन आणि दळणवळण क्षेत्रात मोठी सुधारणा होईल.–सुरेश धस मच्छिंद्रनाथ देवस्थान विश्वस्त तथा आमदार**

**या प्रकल्पांची अंमलबजावणी राष्ट्रीय महामार्ग लॉजिस्टिक व्यवस्थापन लिमिटेड (NHLML) मार्फत होणार आहे. यासाठी राज्य सरकार आवश्यक ती मदत करणार आहे. 'पर्वतमाला' योजनेअंतर्गत रोपवे प्रकल्प दोन पर्यायांद्वारे राबवले जाणार आहेत. पहिला पर्याय जमिनीचा आहे. त्यानुसार सरकारी मालकीची जमीन एनएचएलएमएलला ३० वर्षांच्या भाडेतत्त्वावर दिली जाईल. इतर विभागांच्या मालकीची जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करून ती एनएचएलएमएलला भाड्याने दिली जाईल.खासगी जमीन असल्यास ती संपादित करून एनएचएलएमएलला दिली जाईल.**

## नवरा म्हणजे काय ?

नवरा म्हणजे समुद्राचा
भरभक्कम काठ
संसारात उभा राहतो
पाय रोवून ताठ
कितीही येवो प्रपंच्यात
दुःखाच्या लाटा
तो मात्र शोधीत राहतो
सुखाच्या वाटा

सर्वांच्या कल्याणा करता
पोटतिडकीने बोलत राहतो
न पेलणारं ओझं सुद्धा
डोक्यावर घेऊन चालत राहतो
कधी कधी बायकोलाही
त्याचं दुःख कळत नसतं
आतल्या आत त्याचं मन
मशाली सारखं जळत असतं

नवरा आपल्या दुःखाचं
कधीच प्रदर्शन मांडत नाही
खूप काही बोलावसं वाटतं
पण कुणाला सांगत नाही

बायकोचं मन हळवं आहे
याची नवऱ्याला जाणीव असते
दुःख समजून न घेण्याची
अनेक बायकात उणीव असते

सारं काही कळत असून
नवऱ्याला अपमान गिळावे
लागतात
वेदनांना काळजात दाबून
पुन्हा कष्ट उपसावे लागतात
सगळ्यांच्या आवडी जपता जपता
मन मारीत जगत असतो
बायको , पोरं खूष होताच
तो सुखी होत असतो

इकडे आड तिकडे विहीर
तशीच बायको आणि आई
वाट्टेल तसा त्रास देतात
कुणालाच माया येत नाही

त्याने थोडी हौसमौज केली तर
धुसफूस धुसफूस करू नका
नवऱ्या विरुद्ध विनाकारण
दारू गोळा भरू नका

दोस्ता जवळ आपलं मन
त्यालाही मोकळं करावं वाटतं
हातात हात घेऊन कधी
जोर जोरात रडावं वाटतं
समजू नका नवरा म्हणजे
नर्मदेचा गोटा आहे
पुरुषाला काळीज नसतं
हा सिद्धांत खोटा आहे

मी म्हणून टिकले इथं
दुसरी पळून गेली असती
बायकोनं विनाकारण
नवऱ्याला धमकी दिलेली असती

घरात तुमचं लक्षच नाही
हा एक उगीच आरोप असतो
बाहेर डरकाळ्या फोडणारा
घरी म्यांव म्यांव करीत बसतो

सारख्या सारख्या किरकिरीनं
त्याचं डोकं बधिर होतं
तडका फडकी बाहेर जाण्यास
खूप खूप अधीर होतं

घरी जायचं असं म्हणताच
त्याच्या पोटात गोळा येतो
घरात जाऊन बसल्या बसल्या
तोंडात आपोआप बोळा येतो

नवरा म्हणा , वडील म्हणा
कधी कुणाला कळतात का ?
त्यांच्या साठी कधी तरी
कुणाची आसवं गळतात का ?

पेला भर पाणी सुद्धा
चटकन कुणी देत नाही
कितीही पाय दुखले तरी
मनावर कुणी घेत नाही
वेदनांना कुशीत घेऊन
ओठ शिउन ' तो ' पडून राहतो
सर्वांच्या सुखासाठी
एकतारी भजन गातो

बायको आणि मुलांनी
या संताला समजून घ्यावं
फार काही नकोय त्याला
दोन थेंब सुख द्यावं

मग बघा लढण्यासाठी
त्याला किती बळ येतं
नवऱ्याचं मोठेपण हे
किती जणांच्या लक्षात येतं ?

पान ४ वरून पुढे...

### सोनाजीराव क्षीरसागर....

प्राचार्य महेंद्र गोशाल यावेळी बोलतांना म्हणाले की, प्रत्येक संत हे जनकल्याणासाठी कार्य करत असतात त्याच प्रकारे माँ कर्मा देवी यांनी देखील कार्य केले आहे. म्हणून शेकडो वर्षानंतर देखील आपण त्यांची जयंती साजरी करत आहोत. माँ कर्मा देवी या भगवान जगन्नाथच्या भक्त होत्या असे देखील त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश थोरात यांनी केले.

### गेवराईतील श्री...

कॉलनीत नगरपरिषदकडून पाणी पुरवठा अद्यापपर्यंत करण्यात आलेला नाही. या कॉलनीत जानेवारी नंतर पाणी टंचाईच्या झळा जाणवू लागतात. सध्या तर येथील रहिवासी नागरिकांना विकत पाण्यावर आपली तहान भागवावी लागत आहे. दरम्यान श्री समर्थ पार्क कॉलनीतील सर्व नागरिक नळ कनेक्शन भरण्यासाठी तयार आहेत. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने याबाबत लक्ष देऊन याठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकावी जेणेकरुन उन्हाळ्यात येथील नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार

पान ४ वरून पुढे...

नाही, अशी मागणी नगरपरिषद कार्यालयात लेखी निवेदन देऊन पाठपुरावा करण्यात आला होता. मात्र नगरपरिषद स्तरावरुन अद्यापपर्यंत पाणी पुरवठा करण्यात आलेला नाही. त्यामुळे या कॉलनीतील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. तरी याबाबत नागरिकांच्या भिषण पाणी टंचाईबाबत गांभीर्याने घेऊन नगरपरिषद मार्फत तात्काळ पाईपलाईन करुन पाणी पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी परत एकदा बुधवारी नगरपरिषदेचे सीईओ विक्रम मांडूरके यांना निवेदन देऊन करण्यात आली.

### रुई पिंपळा गावचा...

मोठ्या आदराने एथोचित सत्कर करुन सन्मान केला जातो. शिवराजने आपल्या जिद्द चिकाटी आणि मेहनतीने आपल्या आई वडीलांचे स्वप्न पुर्ण केले आहे. घरची परस्थिती जेमतेम आहे. वडील स्वतःची जिप चालऊन व शेतात काबाड कष्ट करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. रुई पिंपळा गावात विविध उच्च पदावर नोकरीला आहेत परंतु या गावात सैनिक एकही नव्हता हे विशेष तरी यावेळी शिवराज प्रभाकर आंधळे याने आपल्या आवड व इच्छाशक्ती नुसार गावातील पहिला फौजी होण्याचा मान मिळवलेला

पान ४ वरून पुढे...

आहे. त्याचे देशसेवेसाठी असणारे प्रेम गावातील नवीन पिढीसाठी आदर्श व प्रेरणादायी ठरणार आहे. तसेच त्याच्या या यशामध्ये त्याच्या आई वडिलांचा सिहांचा वाटा आहे. आई वडिलांनी दिलेले सुस्कार व त्यांना सर्व समाजाप्रती असणारे प्रेम त्याच्या कामी आले आहे. त्यामुळे आई वडीलांचा ही सर्व ग्रामस्थांच्या उपस्तितीत गावकऱ्यांच्या शुभ हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील पहिला फौजी मान मिळवणारा शिवराज आंधळे यांचा सत्कार करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सापाला किंवा...

चि.अधिराज कराड म्हणाला की,सर्प दंश झाल्या नंतर मी स्थीर राहून उपचारासाठी परळी येथील सर्पदंश उपचार तज्ञ डॉ.सुर्यकांत मुंडे यांच्या देखरेखी खाली चोवीस तास उपचार घेतले.नातेवाईकांना धीर दिला.नंतर माझी चालू असलेली दहावी ची परिक्षा व्यवस्थीत दिली.या परिक्षेत मला चांगले गुण मिळतील. लहान वयातील चि.अधिराज सुग्रीव कराड याने केलेल्या या धाडसाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

पान १ वरून पुढे...

### अडथळा आणणाऱ्यांना...

– २९ तारखेला दुपारी सव्वा दोन वाजता. वाल्मीक कराड व इतर सर्व आरोपी विष्णू चाटे च्या केज येथील पक्षाच्या कार्यालयात भेटले. त्याचे सीसीटीव्ही फुटेज, टॉवर लोकेशन, पुरावे आहेत.

– ६ डिसेंबर रोजी सुदर्शन घुले प्रतीक घुले सुधीर सांगळे, हे साडेबारा वाजता आवादा कंपनीच्या मसाजोग येथील ऑफिस मध्ये आले. सुरक्षा रक्षकाला शिवीगाळ केली मारहाण केली. त्यावेळी शिवाजी थोपटे बाहेर आले. यावेळी सुदर्शन घुले यांनी सांगितले दोन कोटीची मागणी पूर्ण करा किंवा काम बंद करा. हा कंपनीच्या ऑफिस समोर होत असलेला वाद यासंदर्भात माहिती सरपंच संतोष देशमुख यांना दिली हा वाद मिटवण्यासाठी सरपंच संतोष देशमुख व गावातील काही लोक आले. यावेळी सुदर्शन घुले यांनी संतोष देशमुख यांना धमकी दिली. त्यानंतर याची पोलिसांना माहिती दिली. दुपारी दीड वाजता पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि घुले व इतर आरोपींना ताब्यात घेऊन गेले. पण या सर्व आरोपींना प्रत्यक्ष अटक ७ डिसेंबर रोजी पहाटे दाखवण्यात आली. पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले नाही, असे निकम यांनी न्यायालयाला सांगितले.

– ७ डिसेंबर २०२४ रात्री आठ वाजता वाल्मीक कराड याला सुदर्शन घुलेने फोन केला. फोनवर घडलेली संपूर्ण हकीकत सांगितली. यावेळी कराड यांनी अडथळा आणतील त्यांना संपवा असे सांगितले, अशी कबुली घुले यांनी दिली आहे. (त्याचे सीडीआर आणि इतर पुरावे सादर केले आहेत)

– ८ डिसेंबर रोजी विष्णू चाटे सुदर्शन घुले व अन्य एक गोपनीय साक्षीदार असे सर्वजण केज मांजरसुंबा रोड वर नांदूर फाटा येथे तिरंगा हॉटेल वर रात्री नऊ वाजेच्या सुमारास एकत्रित भेटले व त्यांची बैठक झाली. यावेळी विष्णू चाटे संतापला होता. यावेळी घुले यांनी चाटेला सांगितले मी त्या ठिकाणी गेलो होतो पण संतोष देशमुख आडवे आले. यावेळी विष्णू चाटे यांनी वाल्मीक कराड यांचा मेसेज सुदर्शन घुलेला दिला. आडवे आले तर कायमचा धडा शिकवा. (या संपूर्ण प्रकरणाचे टॉवर लोकेशन व इतर पुरावे सादर केले आहेत)

– ९ डिसेंबर २०२४ दुपारी साडेतीन वाजता संतोष देशमुख केस बीड रोडवर उमरी फाटा टोल नाका येथून अपहरण करून क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. किती क्रूर पद्धतीने मारले याचे फोटो आणि व्हिडिओ यातून दिसत आहे. आरोपी यावेळी हसून आनंद घेत होते. आमचे काही होऊ शकत नाही. आमच्यावर यापूर्वीही केसेस आहेत अशा धारणा होत्या. चार्ज फ्रेम साठी ही केस तयार आहे. असा तब्बल ३२ मिनिट

पान १ वरून पुढे...

युक्तिवाद उज्वल निकम यांनी केला.

वाल्मिक कराडचे वकील विकास खाडे यांचा युक्तिवाद

उज्वल निकम यांनी सांगितलेली सर्व घटना याचे सीडीआर आणि लोकेशन पुरावे वारंवार सांगितले जात आहेत. परंतु यातील काहीच आम्हाला मिळालेले नाही. हे मिळावं यासाठी आम्ही मागील तारखेला अर्ज केलेला आहे. आजही अर्ज केला आहे. हे सर्व पुरावे, कागदपत्रं मिळाल्याशिवाय हे पुढे जाता येणार नाही. त्याशिवाय चार्जफ्रेम करता येणार नाही. यावर माननीय न्यायाधीशांनी सर्व कागदपत्र आरोपीच्या वकिलांना उपलब्ध करून देण्यात यावेत, असे आदेश दिले. यावर निकम यांनी कागदपत्र आम्ही देतो, केस पुढे घेऊन जाऊ शकतो, असे म्हणणे मांडले. यावर आरोपीचे वकील विकास खाडे यांनी आपण म्हणता म्हणून केस ओपन झाले असे होत नाही. यावेळी आरोपीचे वकील यांनी गोपाल कृष्ण केसचा संदर्भ दिला. एक तासात संपूर्ण मागणी केलेली कागदपत्रे दिले जातील, असे उज्वल निकम यांनी सांगितले. यावर कागदपत्र मिळाल्यानंतर आम्हाला अभ्यास करण्यासाठी वेळ द्यावा, अशी मागणी वाल्मिक कराडच्या केली. माननीय न्यायालयाने ही मागणी मान्य करत पुढील सुनावणीची तारीख १० एप्रिल दिली.

### मजूर संस्थांचे...

या प्रश्नाच्या अनुषंगाने त्यांनी मजूर संस्थांची कामे सुशिक्षित बेरोजगार व तरुणांना कामे मिळत नाहीत, ठराविक कंत्राटदारांना कामे मिळतात, अशा शब्दांत वरुण सरदेसाई यांनी नाराजी व्यक्त केली. यावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आपल्याला भ्रष्टाचार, अकार्यक्षमता संपवायची असले तर सर्वांवर 'डिजिटायझेशन हा एकमेव उपाय आहे. उपनिबंधकांच्या कार्यालयातील सर्वांना व सहकार आयुक्तांना सांगितले आहे की, पुढील तीन महिन्यांत डीम कन्व्हेअन्स, नोंदणीची प्रक्रिया, सुनावणी ऑनलाइन झाली पाहिजे. त्यासाठी कोणीही ऑफिसला जाणार नाही. या सर्व प्रक्रिया ऑनलाइन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पहिल्या टप्प्यात ऑनलाइन व दुसऱ्या टप्प्यात पुढील सहा महिन्यात 'मेटा'सोबत करार केला आहे. त्यानुसार आपण 'व्हॉटसअॅप गव्हर्नन्स' करीत आहोत आपल्या सर्व सेवा व्हॉटस अॅपच्या माध्यमातून उपलब्ध करून देणार आहोत. कारण अनेकजणांना व्हॉटसअॅप वापरता येते. पण ऑनलाइन करता येत नाही. पैसेही भरण्याची सुविधा उपलब्ध होईल. यात मानवी हस्तक्षेप कमी होईल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले

### डॉ.अशोक थोरात...

पान १ वरून पुढे...

येत आहे तरी मला आंदोलना दरम्यान काही झाले तर सरकार, प्रशासनान जबाबदार राहील यांची नोंद प्रशासनाने तातडीने घेऊन माझी मागणी मान्य करण्यात यावी अशी मागणी रोहन गलांडे यांनी सरकारला व प्रशासनाला निवेदनाद्वारे करण्यात केली आहे. बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी कोरोना काळात कथित भ्रष्टाचार केला असा आरोप केज मतदार संघाच्या आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी विधान सभेत लक्षवेदी लावुन चुकीच्या व सुड बुध्दीने कार्यावाही केलेली आहे म्हणून सकल बहुजन समाज, केज तालुका यांच्या वतीने सुध्दा डॉ. अशोक थोरात यांच्यावर केलेली कार्यवाही नात्काळी मागे घ्यावी अन्यथा केज तालुक्यात तिवृ स्वरुपाचे आंदोलन करु असे निवेदन यावेळी देण्यात आले आहे यावेळी उपस्थित युवा नेते राहुल खोडसे ,अंबाड योगेश,राधाताई सपकाळ,निर्मला सातपुते ,लखन हजारे, धपाटे,कदम यावेळी उपस्थित होते .

### बीडच्या बिंदुनामावली...

वापर केला जात नाही. त्यामुळे मागील काळात बीड जिल्ह्यामध्ये एका विशिष्ट प्रवर्गाचेच अधिकारी आणि कर्मचारी प्रचंड संख्येत नियुक्त झाले आहेत. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात सामाजिक असमतोल निर्माण झाला असून त्याचा परिणाम शासकीय काम काजावर विपरीत स्वरूपात झालेला आहे. विशेषतः पोलीस विभागातील नियुक्ती आणि आंतरजिल्हा बदलीमध्ये व्ही.जे.एन.टी आणि एन.टी.डी. प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या नियमापेक्षा प्रचंड मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. या सर्व बाबी अत्यंत गंभीर आहेत त्यामुळे बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात बैठक घेण्याची विनंती महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्याकडे केली होती. त्यावर ना.अजित दादा पवार यांनी मंत्रालयात याविषयी विशेष बैठक घेतली. बीड जिल्ह्यातील महसूल, पोलिस, जिल्हा परिषद, शिक्षण विभागात नोकर भरती व बदली करताना मागच्याअनेक वर्षापासून बिंदुनामावलीचे पालन करण्यात आलेले नसल्याने त्याचा फटका खुल्या, ओबीसी, एससी, एसटी प्रवर्गातील उमेदवारांना बसला आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने या प्रकारणाच्या चौकशीसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित पवार यांनी दिले आहेत. चौकशी समितीच्या अहवालानंतर कारवाई करण्यात येणार आहे. या बैठकीसाठी आ.प्रकाश दादा सोळंके, आ.सुरेश आण्णा धस, शासकीय विभागांचे सचिव, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रशासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शिवसेना ओबीसी व्हीजे एनटी सेना बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या



**बीड । प्रतिनिधी**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने व महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशावरून तसेच शिवसेना महासचिव संजयजी मोरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना ओबीसी व्हीजे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब, शिवसेना बीड जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप व ओबीसी व्हीजे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या उपस्थितीत दि. २३ मार्च २०२५ रोजी शिवसेना मुख्यालय बाळासाहेब भवन मुंबई येथे शिवसेना ओबीसी व्हीजे एनटी सेना बीड जिल्हा जिल्हाध्यक्ष पदी म नोज (राजाभाऊ) चव्हाण, जिल्हा संघटक पदी दगडू दादा गायकवाड तर जिल्हा कार्याध्यक्षपदी डॉ. केशवदास वैष्णव महाराज यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदीर्घ अनुभव, दांडगा जनसंपर्क व जनतेप्रती सदैव सेवाभाव असणारे महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी तर बीड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांना बीड जिल्ह्यात पक्ष संघटन बांधणीसाठी भरभक्कम साथ देण्याकरिता नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सम र्पकपणे काम करून समाजातील तळागाळातल्या वंचित, पीडित, शोषित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न कराल अशी सदिच्छा देत महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब तथा या कार्यक्रम ास उपस्थित सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी नव नियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# माजलगाव तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजनेत, मुळीक मॅडम तुम्हीच काहीतरी दाखवा करुन

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजनेसाठी खाजगी तत्त्वावर नियुक्त करण्यात आलेले इंजिनीयर, जनतेची मोठ्या प्रमाणात लूट करत आहे सदर इंजिनियर यांना याबाबत विचारले असता शासन काही आम्हाला जीवनभर नोकरीला ठेवणार नाही आमचा जोपर्यंत करार आहे त्या कालावधीतच आम्ही जीवनभराचे कमउन मोकळे होणार असे बोलतात सर्वसामान्य लाभार्थी भरडला जात आहे अगोदरच डोक्यावर छत नाही गावात पत नाही मग अशा अधिकाऱ्याची भरती करण्यासाठी सावकाराच्या दारात उभे राहून दहा ते वीस रुपये टक्केवारीने पैसे काढावे लागतात त्यामुळे व्याज भरून भरून थोडीशी असलेली जागाही सावकार लिहून घेत आहेत नंतर डोक्यावर छत तर नाहीच नाही पाय ठेवायला जागाही राहत नाही त्यामुळे गटविकास अधिकारी म ुळीक मॅडम यांनीही गोर गरीबाची व्यथा मनावर घ्यावी आणि आपल्या पदाची गरीमा राखत पष्ट अधिकाऱ्यावर कारवाई करून आपली चुणूक दाखवावी अन्यथा चोर चोर खले रे भाई चाच प्रत्यय येईल आणि प्रशासनावरील भरोसा उडून जाईल त्यामुळे जनतेचे साथ द्या आणि जनतेच्या गळ्यातील ताईचा एवढी क्षण माफक अपेक्षा

### ♦ घरकुलासाठी कोणालाही पैसे देण्याची आवश्यकता नाही : आदित्य जीवणे

**बीड जिल्ह्यात ग्रामीण भागातील सर्वच गावात पंतप्रधान आवास योजनेची कामे चालू आहेत मागेल त्याला घर हे शासनाचे धोरण असल्यामुळे कोणालाही पैसे देण्याची आवश्यकता नाही सरपंच ग्रामसेवक इंजिनियर यापैकी कोणालाही पैसे देऊ नये मागितल्यास तक्रार करावी आम्ही कडक कारवाई करू अशा आश्वासन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी दिले आहे.**

# कामगार संघटनेच्या बीड आगाराच्या अध्यक्ष पदी राजू पवार तर सचिव नितीन रसाळ बिनविरोध



**चौसाळा । प्रतिनिधी**

दि २५.०३.२०२५ रोजी एकमेव मान्यता प्राप्त महाराष्ट्र एस टी कामगार संघटना बीड आगाराची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली या सभेत सर्वानुमते बीड आगार अध्यक्ष म्हणुन श्री राजाभाऊ पवार व आगार सचिव म्हणुन श्री नितिन रसाळ तर आगार कार्यध्याक्ष म्हणुन श्री वसंत मुंजाळ यांची निवड करण्यात आली यावेळी कामगार संघटनेचे बीड विभागाचे विभागीय सचिव श्री गणेश चव्हाण बीड विभागाचे उपाध्याक्ष श्री विजय कुडके विभागाचे कोषाध्याक्ष श्री विलास आजले जेष्ठ नेते उत्तम राऊत व बीड आगारातील असंख्य कामगार संघटनेचे सभासद हे उपस्थित होते आणि नवनिर्वाचित निवड झालेल्या अध्यक्ष व सचिवांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नवनियुक्त जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांचा रतन गुजर यांच्या वतीने सत्कार



**बीड । प्रतिनिधी**

शिवसेनेचे नवनियुक्त जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांचा धानोरा रोड विभागामध्ये जंगी स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी या ठिकाणी जुने-नवे शिवसैनिक तसेच यावेळी या भागातील हनुम ान बहिरवाळ, रतन तात्या गुजर, आबा मगर, प्रकाश गोकुळे, सुरेश जगताप, कल्याण निर्मळ, राजाभाऊ गुजर, मसु लांडगे, शिवाजी माने, अशोक वाघचौरे, विनायक गुजर व सर्व शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी या स्वागत समारंभ कार्यक्रमात उल्हास गिराम यांना शिवसैनिकांनी आपल्याकडून परिवर्तनाचे अपेक्षा असल्याचे सांगितले यांप्रसंगी उल्हास गिराम सत्कार ला उत्तर देताना म्हणाले की एकाही जुन्याचा व नव्याचा अवमान होऊ देणार नाही सर्वांचा सन्मान करून पक्ष प्रगतीपथावर नेण्याचे काम करीन. माझे ध्येय असेल की सर्वसामान्य दिन दलित १८ पगड जातीच्या समाज बांधवाला बरोबर घेऊन चालण्याचे व सर्वांचा विकास घडवून आणण्याचे स्वप्न राहील आणि मी प्रत्येकाशी सन्म ानपूर्वक वागेल, माझ्याकडून काही चुकल्यास आपल्या सर्व ज्येष्ठांना अधिकार आहे मला सम जावण्याचा मी सर्वांच्या आज्ञेनुसार वागेल व उद्धव साहेबांना अभिप्रेत असलेली शिवसेना करून दाखवीन व पुन्हा एक वेळ भगवा राज्यभर फडकविण्यासाठी प्रयत्न करु असे मनोगत त्यांनी सत्कार समारंभाच्या कार्यक्रमात सर्वांशी बोलतांना व्यक्त केले.



*ब्रह्मा-विष्णू-शिवांचे दर्शन घडवणारा योग! – गेवराई सावता नगर येथील महाशिवपुराण सुरू असल्याने कथा श्रवणाच्या वेळेत महादेवाच्या वेशभूषेत गायत्री पांडे, विष्णूच्या स्वरूपात प्रणाली पांडे , तर ब्रह्मदेव यांच्या रूपात श्रावणी जमदाडे, श्री नारायणाच्या रूपात ओम टोणपे यांनी वेशभूषा घेऊन अनेक भाविक भक्तांचे मन् जिंकली.*



*बीड सोमेश्वर मंदिर येथे स्वप्निल प्रकाश राऊत व वैद्य यांच्या शुभमंगलप्रसंगी वधूवरांना शुभेच्छा देताना भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष नवनाथ आण्णा शिराळे पाटील भाजपाचे बीड विधानसभा विस्तारक शांतिनाथ डोरले काळेगाव हवेलीचे सरपंच भरतराव जी कानडे भाजपा शक्ती केंद्रप्रमुख शामराव राऊत,दत्ता बापू पवार बापूराव येळे महेंद्र राऊत आदी छाया चित्रात दिसत आहेत.*

# डॉ आंबेडकर नगर साठे नगर पाटिल गल्ली संयुक्त जयंती समितीच्या अध्यक्षपदी गोविंद टाकणखार

**माजलगाव । प्रतिनिधी**



डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर माजलगाव येथे दिनांक २४ रोजी भीम जयंती साजरी करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते दयानंद स्वामी होते.

या बैठकीत सर्वानुमते जयंती समितीच्या पदाधीकाऱ्यांच्या एकमताने निवडी करण्यात आल्या असून अध्यक्षपदी गोविंद टाकणखार, उपाध्यक्षपदी संतोष टाकणखार, कोषाध्यक्ष निशिकांत टाकणखार , जयपाल भिसे सचिव बाळकृष्ण शिनगारे चिंतामणी भिसे, मिरवणूक प्रमुख विक्की साळवे बजरंग शिंदे गौतम जावळे विजय साळवे आकाश टाकणखार राजाभाऊ टाकणखार प्रकाश तोडके राजपाल टाकणखार, दीपक टाकणखार नामदेव शिंदे किशोर टाकणखर वशिष्ठ टाकणखार बंटी स्वामी बबलू टाकणखार संजोग कसबे शीलवंत जावळे : सुमित साळवे परमेश्वर शिनगारे हिरामण जावळे करण टाकणखार, आबासाहेब भिसे प्रेम भिसे सौरव अविनाश लोखंडे कांबळे दगडू भिसे विश्वजीत भिसे सुनील भिसे अमिताभ आलझेंडे आशिष आल झेंडे हनुमान भिसे संजय भिसे युवराज भिसे तुकाराम आरे चंद्रमणी भिसे अविनाश आवचार अनिल लोखंडे गोटू भिसे यांची निवड करण्यात आली आहे.


प्रसंगी यूवा नेते अभय होके पाटील , तालेब चाऊस, रोहन घाडगे ईश्वर होके नारायणराव होके पाटील भारतराव होके पाटिल दत्ता महाजन, शुभम डाके मोहसीन बागवान आदी मान्यवर उपस्थित होते.


# आदित्य दंत महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम, अंतिम वर्षाचा 96 टक्के निकाल

## जळगावची अनुष्का सोनवणे प्रथम, पुण्याची संयुक्ता पाटील द्वितीय तर गेवराईची सारिका कापसे तृतीय

**बीड । प्रतिनिधी**

शैक्षणीक क्षेत्रात बीडसह महाराष्ट्रात अग्रगण्य असलेल्या आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य दंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यंदाही यशाची परंपरा कायम राखत उज्वल यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचा अंतिम वर्षीचा निकाला ९६ टक्के लागला असून यामध्ये जळगावची अनुष्का सोनवणे प्रथम, पुण्याची संयुक्ता पाटील द्वितीय तर गेवराईची सारिका कापसे तृतीय आली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, प्राचार्य रॉबर्ट जस्टीन, उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव यांनी अभिनंदन केले.







आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य दंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केल्यानंतर बोलताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव म्हणाले की, संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्रजी सारडा हे विद्यार्थ्यांचे म नोबल वेळोवेळी वाढवत आहे. प्रत्येक विद्यार्थी यशस्वी कसा होईल त्यावर त्यांचे बारकाईने लक्ष असते. त्यामुळे आज महाविद्यालयाचा ९६ टक्के निकाल लागला आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या परिश्रमाचे सोने दाखवले आहे. विद्यार्थ्यांचे यश हेच संस्थेच्या नावाला उजाळा देत असते. विद्यार्थांच्या विजयातच आमच्या प्रयत्नांचा सन्मान असल्याचे उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव सर म्हणाले.

गुरूजनांच्या मार्गदर्शनामुळे यश मि ळाले- बीडीएस च्या अंतिम वर्षात प्रथम क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाल्याचा मनस्वी आनंद आहे. मी घेतलेल्या मेहनती बरोबर माझ्या आदित्य डेंटल कॉलेज चे प्राचार्य रॉबर्ट जस्टीन सर आणि सर्व प्राध्यापक, माझे आई वडील आणि संस्थेचे आधारस्तंभ सुभाषचंद्र जी सारडा यांनी वेळोवेळी प्रेरित करून त्यांचा अमूल्य वेळ आमच्या मार्गदर्शनासाठी अर्पित केल्याने हे यश मिळाले. असल्याची प्रतिक्रीया चोपडा जिल्हा जळगाव येथील विद्यार्थीनी अनुष्का संजय सोनवणे हीने दिली.

पुण्याची संयुक्ता पाटील द्वितीय- आदित्य शिक्षण संस्थेच्या दंत म हाविद्यालयात प्रवेश मिळाला तेव्हा इथं आपल कोण? सर्वच अनोळखी आणि त्यात बीड असा प्रश्न समोर असतांना जेव्हा आदित्य शिक्षण संस्थेत आले तेव्हा येथील सर्व गुरुजनांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. डॉ. अदिती सरडा मॅडम आणि डॉ. हिमांशू सर यांच्या मार्गदर्शनाशिवाय आणि पाठबळाशिवाय हे यश शक्य झाले नसते. बीडीएसच्या अंतिम वर्षात महाविद्यालयातून दुसरा क्रमांक मि ळवण्याचा सन्मान मिळाल्याबद्दल अत्यंत आनंदी असल्याचे संयुक्ता सुरेश पाटील ही विद्यार्थीनी म्हणाली.

पुस्तकी ज्ञानाबरोबर सर्वांगीण शिक्षण मिळाले- सारिका कापसे

अंतिम वर्षाचा निकाल जाहीर झाला आणि आनंदाची बाब म्हणजे त्यात तृतीय क्रमांक पटकावला. जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर यश मिळाले याचा खूप आनंद झाला. बीडीएसचे शिक्षण घेत असतांना येथे आम्हाला केवळ पुस्ती ज्ञान मिळाले नाही तर पुढे काय कराचे याची शिदोरी या महाविद्यालयातून मिळाली.

या यशामध्ये आदित्य शिक्षण संस्थेचे मोठे योगदान आहे. शिक्षण घेत असतांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी संस्था नेहमीच तत्पर राहिली. असल्याचे गेवराईची सारिका संजय कापसे हीने सांगितले.

# कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्सचा सृजन 2025 महोत्सव उत्साहात संपन्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या , बी सी ए वतीने सृजन २०२५ हा माहिती-तंत्रज्ञान आधारित उपक्रम २० मार्च २०२५ गुरुवार रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सीमा व्ही येरगिरी विभाग प्रमुख, इंजिनिअरिंग कॉलेज, अंबाजोगाई यांच्या हस्ते झाले, तर टेक्नोसॉफ्ट कंपनी कलबुर्गीचे संचालक विवेक होंगुंटीकर, मॅनेजिंग डायरेक्टर संकेत मोदी आणि सौ. डिंपल मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. तर कार्यक्रम ात बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी, प्राचार्य डॉ. बी.आय. खडकभावी, प्रा. व्ही. बी. चव्हाण,प्रा डी. एच. थोरात,प्रा राघवेंद्र राजमान्य, डॉ. व्ही. एस. हमदे , प्राचार्य डॉ. तपस्या गुप्ता तसेच सर्व युनिट प्रमुख उपस्थित होते.

या कार्यक्रमात श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांनी सृजन २०२५ ही संकल्पना राबविण्यामागची कारण मीमांसा विशद केली. विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान विषयांतील माहिती केवळ आपल्या महाविद्यालयापुरतीच अवगत न होता अन्य जिल्ह्यातील महाविद्यालये तसेच तेथील प्राध्यापक वृन्दाकडून देखील अवगत केल्या जाऊन आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी त्या त्या विषयात निपुन व्हावा ही यामागची कल्पना असल्याचे संकेत मोदी यांनी नमूद केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला चालना देणारा ठरला असून, भविष्यातही असे उपक्रम आयोजित करण्याचा म हाविद्यालयाचा मानस असल्याचे संकेत मोदी यांनी याप्रसंगी व्यक्त केला. याप्रसंगी अनेक सहभागी विद्यार्थ्यांनी पेपर प्रेझेंटेशन अँड प्रोगामींग कॉन्टेस्ट, कोड क्राफ्टर या विषयावरील स्पर्धेत सहभाग घेतला होता.

CMYK

दैनिक

● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

गुरूवार, दि.२७ मार्च २०२५ पान ४

## सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात माँ कर्मा देवी यांची जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयामध्ये महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.अरुण भस्मे यांच्या मार्गदर्शनाखाली माँ कर्मा देवी यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, उपप्राचार्य डॉ. गणेश पांगारकर, डॉ.राजू घुगे, डॉ.विवेक दुसाने, डॉ.नासेर शेख, डॉ.अनिस अहेमद, सौं. संध्या गौशाल, एकनाथ टेपाळे, तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाचे ▶▶ उर्वरित पान २ वर

# आई-बापाला शेवटच्या श्वासापर्यंत जीव लावा, त्यांच्या प्रत्येक श्वासावर प्रेम करा : प्रा.वसंत हंकारे

### कोळगाव येथे ‘न समजलेले आईबाप, समजून घेताना’ व्याख्यान; हृदयस्पर्शी व्याख्यानाने उपस्थित गहिवरले

**गेवराई । प्रतिनिधी**

मुला-मुलींच्या आयुष्यात फक्त एकच देव आहे, तो म्हणजे आपला बाप आणि एकच देवी आहे, ती म्हणजे आपली आई. आपल्या आई-बापाला समजून घेण्याची वेळ आली आहे. आपल्या एखाद्या कृत्याने आई-बापाची मान खाली जाईल असे कृत्य आपल्या हातून घडणार नाही याची काळजी घेण्याचे सांगत त्यांना लाचार करू नका, त्यांचे नाव रोशन करण्यासाठी चांगले संस्कार मनाशी बाळगा, असे आवाहन करतानाच आपल्या आई-बापाला शेवटच्या श्वासापर्यंत जीव लावा, त्यांच्या प्रत्येक श्वासावर प्रेम करा, कारण आई-बापाचा श्वास निघून गेला तर भिंतीवरच्या फोटोतील आई-बाप कधीच तुम्हाला जीव लावायला येणार नाही याची जाणीव ठेवा, असे विचार सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा.वसंत हंकारे यांनी मांडले. दरम्यान प्रा.हंकारे यांच्या या हृदयस्पर्शी व्याख्यानाने उपस्थित गहिवरुन गेले होते.



गेवराई तालुक्यातील कोळगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात मंगळवारी रात्री ‘न समजलेले आईबाप.. समजून घेताना’ या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते, यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन प्रा. वसंत हंकारे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते झाले. पुढे बोलताना प्रा.हंकारे म्हणाले की, ज्या आई-बापाने आपल्याला जन्म दिला, मोठे केले, अंगा-खांद्यावर खेळवले, त्या बापाने आपल्यासाठी किती केले आहे. याचा हिशेब तुम्ही कधी करणार? कारण आज हिशोब करण्याची वेळ आलेली आहे. तो तुम्हाला करावाच लागेल, असे विद्यार्थ्यांना त्यांनी बजावून सांगितले.

त्याचबरोबर जो निराधार आहे, त्यांना आई-बापाची किंमत विचारा, आई-बापाची किंमत त्याला विचारा ज्याचे लहानपणीच आई-बाप त्याला सोडून गेले आहेत. ते तुम्हाला पूर्ण जाणीव करून देतील असे सांगत सणासुदीला आपला बाप कपड्याच्या दुकानात ज्यावेळी नवीन कपडे खरेदी करून देण्यासाठी आपल्याला घेऊन जातो, त्यावेळी संपूर्ण दुकान आपले असल्याचा भास होतो. कारण पाठीमागे आपला बाप असतो. त्यामुळे आई-बापाची शेवटच्या श्वासापर्यंत काळजी घ्या, त्यांच्यामध्येच देव शोधा. व्याख्यान संपल्यानंतर घरी जाऊन पहिले पळत पळत जाऊन आई बापला कडकडून मिठी मारा, यामध्ये सर्वोच्च आनंद असल्याचे प्रा. हंकारे यांनी सांगितले. प्रा.हंकारे यांच्या अत्यंत हृदयस्पर्शी व काळजाला भिडणाऱ्या व्याख्यानाने मुलींसह आई-बापांना अश्रू अनावर झाले होते. यावेळी काही मुलींनी आई-बापांविषयी कृतज्ञता व्यक्त करुन आई-बापाशिवाय हे जीवन व्यर्थ असल्याचे सांगून अश्रुंना वाट मोकळी करून देत भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाला नुतन कोळेश्वर विद्यालयातील शिक्षण वृंद तसेच कोळगावसह परिसरातील विद्यार्थी, पालक, नागरिक, महिला यांची मोठी उपस्थिती होती.

## प्रसिद्ध विधीज्ञ अ‍ॅड.उज्ज्वल निकम यांची ऑलिव रेस्टॉरंट आणि रिजेन फिटनेस येथे सदिच्छा भेट

**बीड । प्रतिनिधी**

बहुचर्चित खटल्यांमध्ये महत्त्वाची कामगिरी करत तसेच दहशतवादी अजमल कसाब विरुद्ध खटल्यात सरकारी वकील म्हणून महत्वाची कामगिरी बजावणारे प्रसिद्ध विधीज्ञ ॲड.उज्ज्वल निकम यांनी येथील नगर नाका परिसरात असलेल्या ऑलिव रेस्टॉरंट आणि रिजेन फिटनेस येथे सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी त्यांच्या समवेत येथील प्रसिद्ध वकील ड.बाळासाहेब कोल्हे यांची उपस्थिती होती. यावेळी दोन्ही जेष्ठ विधीज्ञ यांचा सत्कार इंजिनीयर राजेंद्र भोपळे, इंजिनीयर प्रतीक भोपळे यांच्या



हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ऑलिव रेस्टॉरंटचे मॅनेजर संजय धुरंधरे, रिजेन फिटनेसचे मॅनेजर पंकज तावरे यांच्या समवेत मित्र परिवार आणि येथील कर्मचारी उपस्थित होते.

## गेवराईतील श्री समर्थ पार्कमध्ये भिषण पाणी टंचाई

### पाईपलाईन टाकून पाणीपुरवठा करा; नगरपरिषदेचे सीईओ यांना दिले निवेदन

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील ताकडगाव रोडवर असलेल्या श्री समर्थ पार्क या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन नसल्याकारणाने उन्हाळ्यात येथील रहिवासी नागरिकांना तिव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. जानेवारी महिण्यांपासून येथील बोअरवेलचे पाणी कमी झाल्याने नागरिकांना भिषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. मागील दोन वर्षापासून मागणी होत असताना देखील याठिकाणी नगरपरिषद कडुन पाण्याची



पाईपलाईन अद्यापही टाकण्यात आलेली नाही. परिणामी सध्या येथील रहिवासी नागरिकांना टँकरने विकतचे पाणी घ्यावे लागत आहे. यासंदर्भात बुधवारी नगरपरिषदेचे सीईओ यांची भेट घेऊन तात्काळ पाणी पुरवठा करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. गेवराई शहरातील ताकडगांव रोडवर श्री समर्थ पार्क आहे. दरम्यान या ▶▶ उर्वरित पान २ वर

### निवेदनाची तात्काळ दखल, संबंधितांना कारवाईसाठी सुचना

**श्री समर्थ पार्कमधील नागरिकांनी बुधवारी नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम मांडूरके यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पाणीटंचाई संदर्भात व्यथा मांडल्या, तसेच याठिकाणी नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यात यावा या मागणीचे निवेदन दिले. यावेळी सीईओ विक्रम मांडूरके यांनी लगेच संबंधित पाणी पुरवठा अभियंता निवृत्ती कड यांच्याशी बोलून तात्काळ पुढील कारवाई करण्यासंदर्भात सूचना दिल्या. त्यामुळे निवेदनकर्त्यांनी सीईओ मांडूरके यांचे आभार व्यक्त केले.**

## रुई पिंपळा गावचा शिवराज आंधळे झाला पहीला फौजी सरपंच मयुर आंधळे व ग्रामपंचायतने केले जंगी स्वागत



**गावात मागील १ वर्षात एक क्लास वन ऑफिसर, दोन क्लास टू ऑफिसर आणि शिवराजची अगदी वयाच्या १८ व्या वर्षी लष्करामध्ये निवड झाली आहे. गेल्या वर्षभरात जवळपास ४ आधिकारी म्हणुन गावातून निवड झाली. गावातील पुडील तरुण पिडी व शिक्षण घेत आसलेल्या विद्यार्थ्यांनी पाहीलेले स्वप्न पुर्ण करण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळावी. यासाठी आम्ही ग्राम पंचातच्या वतीने गावच्या भुमी पुत्रांचा त्यांच्या आई वडीलांसह सत्कार करत आसतोत. – मयुर आंधळे (सरपंच रुई पिंपळा)**

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील रुई पिंपळा गावचे भुमिपुत्र शिवराज प्रभाकर आंधळे यांची नुकतीच भारतीय लस्करामध्ये निवड झाली. गावातील पहीलाच फौजी होण्याचा मान त्याला मिळाल्याने गावचा स्वाभिमान म्हणुन ग्रामपंचायत युवा सपंच मयुर आंधळे यांच्या पुढाकाराने गावात गावकऱ्यांच्या वतीने भुमीपुत्राचा यथोचित सत्कार करुन जंगी स्वागत करण्यात आले.

तालुक्यातील रुई पिंपळा हे गाव डोंगर पट्यातील पुनर वसीत गाव आहे. गावात सर्व समाज बांधव गुण्या गोविंदाने नांदतात. गावचे उच्च शिक्षीत गावचा कायापालट करणारे युवा सरपंच मयुर आंधळे यांच्या संकल्पनेतुन आतापर्यंत गावातील जे शासकीय नोकरदार वर्ग आहे त्यांचा व त्यांच्या आई वडीलांसह गावात ▶▶ उर्वरित पान २ वर

## सापाला किंवा सर्प दंशाला घाबरू नका : चि.अधिराज कराड चि.अधिराज कराड चा प्रा.ईश्वर मुंडे यांच्या कडून सत्कार

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

इंजेगाव ता.परळी येथील १६ वर्षाचा चि.अधिराज सुग्रीव कराड याला मागील महीन्यात सर्प दंश झाला होता परंतू चि.अधिराज कराड ने तात्काळ सापाला प्रतिकार करून बाजूला झटकून फेकले त्या मुळे सापाला आपले विष त्याच्या शरिरात सोडता आले नाही व पुढील अनर्थ टळला.

लहान वयातील चि.अधिराज सुग्रीव कराड ने हे धाडस केल्यामुळे व न घाबरता हा प्रसंग हाताळल्याची दखल घेऊन सामाजिक क्षेत्रात अग्रेसर



असलेल्या प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी चि.अधिराज सुग्रीव कराड याचा शाल,श्रीफळ व मानाचा फेटा देवून सत्कार केला. या वेळी परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुर्यभान मुंडे,सेवा निवृत्त उप शिक्षणाधिकारी हिरालाल कराड,आदर्श शिक्षक सोपानराव कराड,केज पं.स.चे माजी उप सभापती नारायणराव घुले व बहू संख्येने नागरीक उपस्थीत होते. या वेळी चि.अधिराज कराड म्हणाला की,भारत देशात सापाच्या अनेक जाती अढळत असून त्या पैकी मोजक्याच जाती विषारी आहेत.त्या मुळे सापांना भिवू नये.तसेच सर्प दंश झाला तर तात्काळ प्रतिकार करून साप झटकून बाजूला टाकावे जेणे करून साप चावल्या नंतर त्याला पलटी होऊन आपले विष मानवी शरीरात सोडण्यास वेळ मिळू नये म्हणजे आपल्याला धोका होत नाही.तसेच जर सर्प दंश झालाच तर धीर धरून औषध उपचार घेतले तर माणसाला कोणताही धोका होत नाही. पुढे ▶▶ उर्वरित पान २ वर

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका दरम्यान यु टर्न नाही

### न्यायालय, जिल्हाधिकारी, तहसिलला जाण्यासाठी पाऊण किलोमीटरचा हेलपाटा ; जिल्हाधिका-यांनी लक्ष्य घालावे : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील बीड शहरातील २ किलोमीटर रस्त्याचे नियोजन शुन्य काम केल्याने दीड वर्ष लोटूनही शहरातील दोन किलोमीटर अंतराचा रस्ता अद्याप पूर्ण झालेला नाही. याठिकाणी खडी,धुरळा उडुन वाहनचालकांना त्रास होतो. नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. मनमानी कारभारामुळे व रखडलेल्या कामामुळे अपघाताला निमंत्रण मिळत असून सर्वसामान्यांचे हाल होत आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भाने कठोर भूमिका घेत या कामाची पाहणी केल्यानंतर महामार्ग प्राधिकरणाचे अधिकाऱ्यांना पत्र देऊन कंत्राट दाराची मनमानी थांबविण्याचे सुचवत सदर काम कोणत्याही परिस्थितीत एक आठवड्याच्या पूर्ण करण्याचे तसेच कंत्राटदारास एक कोटीचा अतिरिक्त दंड करण्याचे निर्देश दिले आहेत.या रस्त्यावरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगर नाका दरम्यान



यापूर्वी सहा जागेवर यू टर्न घेण्यासाठी जागा सोडण्यात आली होती. सध्या मात्र एकही यु टर्न नाही. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून न्यायालय, तहसील, सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे जाण्यासाठी नागरिकांना आता नगर नाक्याचा पाऊण किलोमीटरचा हेलपाटा मारावा लागणार आहे. दुसरीकडे या रस्त्याच्या उत्तर बाजूला मुलींचे वस्तीगृह ,जुनी जिल्हा परिषद (ज्यामध्ये आजही अनेक कार्य सुरू आहेत) न्यायालय ,तहसिल, मुख्य प्रशासकीय इमारत, सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालय तर दक्षिण बाजूला शासकीय प्रशिक्षण आरोग्य केंद्र, जिल्हा कारागृह, शासकीय विश्रामगृह, चंपावती क्रिडामंडळ ,पंचायत समिती आदी कार्यालये आहेत. त्यामुळे भविष्यात या कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांच्या अडचणी व संभाव्य अपघात लक्षात घेता पूर्वीप्रमाणेच यु टर्न दुभाजकांमध्ये ठेवण्यात यावेत. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर व शेख युनुस च-हाटकर यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.




CMYK